# अदानी इलेक्ट्रिसिटी लिमिटेडला 'बेस्ट परफॉर्मिंग युटीलिटी' पुरस्कार

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडला (एईएमएल) केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळाच्या (सीबीआयपी) २०१९ सालच्या पुरस्कार सोहळ्यात 'वीजनिर्मिती, पारेषण व वितरण अशी एकात्मिक ऑपरेशन्स असलेली सर्वोत्तम कामगिरी करणारी कंपनी' या पुरस्काराने गौरवण्यात आले. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत उत्तम योगदान देणारी कंपनी म्हणून एईएमएलला मान्यता देण्यात आली. ऊर्जा क्षेत्रातील सर्व विभागांमध्ये आघाडीचे स्थान प्राप्त करून कंपनीने हे दाखवून दिले आहे. ऊर्जा तसेच नवीन व नुतनीकरणीय ऊर्जा खात्याचे मंत्री आर. के. सिंग यांच्या हस्ते अदानी इलेक्ट्रिसिटीला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अदानी ट्रान्समिशन लिमिटेडचे मुख्य कार्यपालन अधिकारी अरविंद कुमार शर्मा यांनी हा पुरस्कार स्वीकारला.